# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२११२८
२५६२११२९
ई–मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे–४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निववि/891 दिनांक : 14/११/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
मा. विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग

विषय – विद्यापीठ वर्धापनदिन पुरस्कार सन २०२४–२५
संदर्भ – नियोजन व विकास विभागाचे परिपत्रक क्रमांक ८५७/दि. १६/१०/२०२४

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय शैक्षणिक गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता विद्यापीठ वर्धापनदिनी देण्यात येणा–या उत्कृष्ट विद्यापीठ शैक्षणिक विभाग, उत्कृष्ट महाविद्यालये/परिसंस्था, उत्कृष्ट प्राचार्य/संचालक पुरस्कार (महाविद्यालये/परिसंस्था), उत्कृष्ट अध्यापक पुरस्कार (महाविद्यालये/परिसंस्था), तसेच राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार प्राप्त अध्यापकांचा सन्मान (felicitation) (महाविद्यालये/परिसंस्था व विद्यापीठ विभाग), नाविन्यपूर्ण विशेष उपक्रम/संशोधन पुरस्कार–प्राचार्य/संचालक, अध्यापक पुरस्कार, उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार, उत्कृष्ट शारीरिक शिक्षण व क्रिडा इ.साठी अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर, २०२४ ते गुरूवार दिनांक १४ नोव्हेंबर,२०२४ असा निश्चित करण्यात आला आहे.

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाची एक छापील प्रत आवश्यक कागदपत्रासह **बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२४** पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये नियोजन व विकास विभागामध्ये सादर करावयाची होती. या पत्रान्वये सदरील मुदत **गुरूवार दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४** पर्यत वाढविण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावासोबत अर्जदाराचे पासपोर्ट आकाराची दोन छायाचित्रे व जर प्रस्ताव उत्कृष्ट महाविद्यालय व परिसंस्थेसाठी असेल तर महाविद्यालय/परिसंस्थेच्या इमारतीचे (महाविद्यालय/परिसंस्थेचे नांव दिसेल असे) पोस्टकार्ड आकाराचे दोन छायाचित्रे सादर करावीत.

आपणांस विनंती की, सदर पत्र आपल्या महाविद्यालय/संस्थेमधील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाच्या छापील प्रती विहीत मुदतीत सादर न केल्यास तसेच ऑनलाईन पध्दतीव्यतिरिक्त सादर केलेल्या कोणत्याही अर्जाचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. या संदर्भात काही माहिती साठी/तांत्रिक मदतीसाठी ०२०–७१५३३६३३ या नंबरवर संर्पक साधावा.

कळावे.

14/11/2024

(श्री. सतिश गडदरे)
सहायक कुलसचिव